# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## गुरुवार, दिनांक ८ मार्च, २०१८

## (सकाळी १०.०० ते १०.४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **सर्वश्री. भास्कर जाधव, सुनिल प्रभु, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मौजे ऐनवली-मोहाने (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील कु. अंकिता सुनिल जंगम हिचे अपहरण करुन बलात्कार व हत्या केल्या प्रकरणाची सीआयडी मार्फत चौकशी करण्यासाठी अखिल भारतीय वीरशैव लिंगायत महासंघ व ग्रामस्थांनी प्रांत अधिकारी, खेड यांच्या कार्यालयासमोर दिनांक २६ फेब्रुवारी, २०१८ रोजी पासून सुरु केलेले उपोषण, सदरहू प्रकरणी खेड पोलीसांनी सुकीवली येथील श्री गगनगिरी कात इंडस्ट्रीज या कारखान्यातील ६ जणांना केलेली अटक, कारखान्यात काम करणारे गणेश राज शिर्के, संदेश चव्हाण व अन्य चौघांनी कु. अंकिताचे दिनांक २८ डिसेंबर, २०१७ रोजी रात्री अपहरण करुन तिच्यावर अत्याचार करुन तिचा मृतदेह कुडोशी गावातील नदीपात्रात फेकून देणे, सदर प्रकरण दडपण्यासाठी कात कारखान्याच्या मालकाने कु. अंकिताच्या आईवर आर्थिक आमिष दाखवून दबाव टाकणे, पोलीसांनी कंपनी मालकाची चौकशी न करता किरकोळ गुन्हे दाखल केल्याने आरोपी जामीनावर सुटणे, कु. अंकिताची हत्या झाली असतानाही पोलीसांनी आत्महत्येचा गुन्हा नोंदवणे तसेच शवविच्छेदन अहवालातही विसंगती असल्यामुळे नातेवाईक व ग्रामस्थांमध्ये पसरलेला असंतोष, सदरहू प्रकरणाची सीआयडी मार्फत चौकशी करुन संबंधितांना तात्काळ निलंबित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री. अजय चौधरी, एकनाथराव खडसे-पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"जळगांव जिल्हा परिषदेमध्ये सन २०१७ पर्यंत अपंग युनिट मधुन जिल्हा परिषदे अंतर्गत विशेष शिक्षक / परिचर समायोजन करण्यासाठी शासनाने दिलेली मान्यता, त्यानुसार विशेष शिक्षक / परिचर यांना सामान्य शिक्षक या पदावर समायोजनाने सामावुन घेण्याची करण्यात आलेली कार्यवाही, समायोजनाची कार्यवाही करीत असतांना शासन

पत्राच्या प्रमाणित प्रती, न्यायालयाच्या निकालाच्या प्रती, मुळ यादी उपलब्ध नसतांना या प्रकरणी खात्री व पडताळणी न करता जिल्हा परिषदेच्या प्राथमिक व माध्यमिक विभागातील अधिकाऱ्यांनी संगनमताने गैरव्यवहार करुन समायोजनाची केलेली कार्यवाही, या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांच्याकडे तक्रारी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी शालेय शिक्षण विभाग व ग्रामविकास विभागाकडे प्रस्ताव पाठवून मार्गदर्शन मागविणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांनी शिक्षणाधिकारी, माध्यमिक व प्राथमिक, जिल्हा परिषद, जळगांव यांना सात दिवसांच्या आत कार्यान्वीत अपंग युनिटचे पडताळणी करण्याचे आदेश देणे, त्याअनुषंगाने शिक्षणाधिकारी माध्यमिक व प्राथमिक, जळगांव यांच्याकडून मोघम व दिशाभुल करणारा दिलेला अहवाल, सदर प्रस्ताव दप्तर दाखल होण्याचा निर्माण झालेला संशय, अशाच प्रकारे राज्यातील जिल्हा परिषदेमधील गैरव्यवहाराची विशेष पोलीस महानिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखालील विशेष चौकशी पथक नेमून चौकशी करुन दोषींविरुध्द कारवाई करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **सर्वश्री. राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, मो. आरिफ नसीम खान, अमित देशमुख, अमिन पटेल, त्र्यंबक भिसे, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. सुनिल केदार, अमर काळे, अस्लम शेख, हर्षवर्धन सपकाळ, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री. अब्दुल सत्तार, संग्राम थोपटे, राहुल बोंद्रे, भारत भालके, सुरेश गोरे, ॲड. राहुल कुल, सर्वश्री. जगदीश मुळीक, शरद सोनावणे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील ४६९ नागरी, ग्रामीण, बिगर शेती सहकारी पतसंस्थेत ११.२३ लाख ठेवीदारांच्या १,६३२ कोटी रुपयांच्या अडकून पडलेल्या ठेवी, सदरच्या ठेवी परत मिळविण्याकरीता ठेवीदारांनी शासनाकडे वारंवार केलेले अर्ज, गेल्या आठ वर्षात अनेक पतसंस्था ठेवीदार मयत झाले असून त्यांच्या अंत्यविधीलाही त्यांच्या हक्काच्या ठेवीची रक्कम त्यांना व त्यांच्या नातेवाईकांना न मिळणे, पतसंस्थेच्या थकीत कर्जाची सर्व रक्कम शासनाने जमा केल्याने ठेवीदारांना देण्यासाठी एकपैसाही पतसंस्थेत शिल्लक न राहणे, परिणामी ठेवीदार आपल्या हक्काच्या रक्कमेपासून वंचित राहणे, ठेवीदारांच्या ठेवी परत देण्यासाठी पतसंस्थेचे पदाधिकारी यांनी शासनाकडे माहे जानेवारी, २०१८ मध्ये तसेच यापूर्वीही अनेकवेळा तक्रार करुनही कोणतीच कार्यवाही करण्यात न आल्याने ठेवीदारांमध्ये निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**( सकाळी ११.०० वाजता )**

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) मुख्यमंत्री :** विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **सामान्य प्रशासन विभागाचा** सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

**(२) वित्त व नियोजन मंत्री :**

(क) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी सन २०१७-२०१८ सभागृहासमोर ठेवतील.

(ख) विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **नियोजन विभागाचा** सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

**(३) शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री :** विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा** सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

**(४) ग्रामविकास आणि महिला व बाल विकास मंत्री :** विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **ग्रामविकास व जलसंधारण विभाग आणि महिला व बाल विकास विभागाचा** सन

२०१६-२०१७ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

**(५) पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचा** सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

**तीन** : **स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**चार** : **शासकीय विधेयके :**

**(अ) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये प्रा.विरेंद्र जगताप, सर्वश्री. अस्लम शेख, हर्षवर्धन सपकाळ, विजय वडेट्टीवार, अजित पवार, जितेंद्र आव्हाड, शशिकांत शिंदे, भास्कर जाधव, जयंत पाटील, संदीप नाईक, अबु आझमी, भारत भालके, श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर, सर्वश्री. संजय कदम, हसन मुश्रीफ, राहुल जगताप, संग्राम जगताप, सुरेश लाड, दिलीप सोपल, वैभव पिचड, आसिफ शेख, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री. राणाजगजितसिंह पाटील, हनुमंत डोळस, बाळासाहेब पाटील, श्रीमती सुमनताई पाटील, सर्वश्री.पंकज भुजबळ, राधाकृष्ण विखे-पाटील, श्रीमती दिपिका चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ — महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) अध्यादेश, २०१८ नापसंत करते."

(ख) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ — महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ – महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, अमर काळे, डॉ.संतोष टारफे, श्रीमती निर्मला गावीत, श्री.कुणाल पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ – महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.बसवराज पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ – महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अमित झनक, भारत भालके, हर्षवर्धन सपकाळ, प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ – महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री अजित पवार, जितेंद्र आव्हाड, शशिकांत शिंदे, भास्कर जाधव, जयंत पाटील, संदीप नाईक, अबु आझमी, भारत भालके, श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर, सर्वश्री संजय कदम, हसन मुश्रीफ, राहुल जगताप, संग्राम जगताप, सुरेश लाड, दिलीप सोपल, वैभव पिचड, अस्लम शेख,

विजय वडेट्टीवार, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री हर्षवर्धन सपकाळ, राणाजगजितसिंह पाटील, हनुमंत डोळस, बाळासाहेब पाटील, श्रीमती सुमनताई पाटील, श्री.पंकज भुजबळ, श्रीमती दिपिका चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ – हैदराबाद अतियात चौकशी (सुधारणा) अध्यादेश, २०१८ नापसंत करते."

(ख) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ – हैदराबाद अतियात चौकशी (सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमिन पटेल, सुनिल केदार, अमर काळे, डॉ.संतोष टारफे, श्रीमती निर्मला गावीत, श्री.कुणाल पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ – हैदराबाद अतियात चौकशी (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ – हैदराबाद अतियात चौकशी (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.बसवराज पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ – हैदराबाद अतियात चौकशी (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ – हैदराबाद अतियात चौकशी (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही

सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(३)** (क) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ — महाराष्ट्र वेश्म मालकी (सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमिन पटेल, सुनिल केदार, अमर काळे, डॉ.संतोष टारफे, श्रीमती निर्मला गावीत, श्री.कुणाल पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ — महाराष्ट्र वेश्म मालकी (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ — महाराष्ट्र वेश्म मालकी (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.बसवराज पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ — महाराष्ट्र वेश्म मालकी (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ — महाराष्ट्र वेश्म मालकी (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(ब) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५६ — महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०१७ यात विधानपरिषदेने केलेल्या सुधारणांना सहमती देणे.**

**(बुधवार, दिनांक ७ मार्च, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**पाच : श्री.सुनिल प्रभु, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री अजय चौधरी, संजय केळकर, सुनिल शिंदे, ॲड॰ राज पुरोहित, श्री सदा सरवणकर, ॲड.पराग अळवणी, सर्वश्री अशोक पाटील, अमित साटम, मंगेश कुडाळकर, श्रीमती मनिषा चौधरी, श्री.सुनिल राऊत, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री प्रकाश फातर्पेकर, अतुल भातखळकर, श्रीमती तृप्ती सावंत, सर्वश्री योगेश सागर, संजय पोतनीस, सरदार तारासिंह, रमेश लटके, कॅ.आर.तामिल सेल्वन, श्री.प्रकाश सुर्वे, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्री तुकाराम काते, राम कदम, नरेंद्र मेहता, मंगलप्रभात लोढा, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) :-**

"मुंबई शहर व उपनगरांचा सन २०१४ ते २०३४ या २० वर्षाचा शासनाकडे प्रलंबित असलेला विकास आराखडा, विकास आराखडयास मंजूरी न दिल्यामुळे ठप्प झालेली विकास कामे, विकास आराखडयास त्वरित मान्यता देण्याची आवश्यकता, गृहनिर्माण धोरणास मान्यता देण्यास होत असलेला विलंब, ५०० चौ. फुटापर्यंतच्या मुंबईतील घरांना मालमत्ता करामध्ये सवलत देण्याबाबतच्या निर्णयास शासनाने त्वरित मान्यता देण्याची आवश्यकता, मुंबईतील शिवडी, गोराई (बोरिवली), माहिम भागातील जैवविविधतेमुळे पानथळीने व्यापलेले क्षेत्र पर्यटन क्षेत्र म्हणून जाहीर करण्याच्या जिल्हयाधिकाऱ्यांना दिलेल्या सूचना, तथापि, जिल्हाधिकाऱ्यांनी कोणतीच कार्यवाही न केल्यामुळे पानथळ क्षेत्रांवर दिवसेंदिवस वाढत जाणारी अनधिकृत बांधकामे, मुंबई शहर व उपनगरातील विकासक, मोठमोठया कंपन्या, मॉल्स यांनी महापालिकेचा सुमारे १३३.२५ कोटी रुपयांचा थकवलेला कर, विविध शासकीय कार्यालयांनी ३२० कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कमेची थकविलेली पाणी देयके, म्हाडा वसाहतीमधील सदनिकांचे रुपये १५५ वरुन रु. १०२७ पर्यंत माहे एप्रिल, १९९८ पासून पूर्वलक्षी प्रभावाने वाढविण्यात आलेले सेवाशुल्क, म्हाडाच्या ५६ वसाहतींचा रखडलेला पुर्नविकास व या वसाहतीमधील ५० वर्षापूर्वीच्या मल:निसारण वाहिन्या दुरुस्त न केल्यामुळे पाणी तुंबून त्या ठिकाणी रोगराई पसरण्याचा निर्माण झालेला धोका, मुंबईतील मोडकळीस आलेल्या उपकर प्राप्त व बिगर उपकरप्राप्त सुमारे १४ हजार इमारती, पंतप्रधान आवास योजना, इमारत व पुनर्रचना मंडळाच्या व झोपडपट्टी पुर्नविकास योजनेतंर्गत बांधलेल्या इमारतीची दुरुस्ती, बीपीटी व बीआयटीच्या जागेवरील धोकादायक इमारती, म्हाडाच्या

इमारतींमध्ये ३०० पेक्षा जादा घुसखोर असल्याचे निष्पन्न होणे, मुंबईतील सात रस्ता (आर्थर रोड) येथील मध्यवर्ती कारागृहाच्या सुरक्षिततेसाठी कारागृहापासून ५०० मीटर परिसरातील इमारतींचा व झोपडपट्टयांचा १० वर्षापासून खुंटलेला पुनर्विकास, वरळी येथील प्रेमनगर, व्ही. पी नगर, सिध्दार्थ नगर, जिजामाता नगर, मरिअम्मानगर इत्यादींचा गेल्या अनेक वर्षापासून रखडलेला पुनर्विकास, मुंबईतील कोळीवाडयांचे सीमांकन न झाल्यामुळे त्या परिसराच्या विकासासाठी योजना आखण्याची आवश्यकता, मुंबईतील ॲनी बेझंट रोडवरील अटारिया मॉल येथे वाढत्या दहशतीमुळे त्या ठिकाणी तातडीने भुयारी मार्ग तयार करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींची मागणी, भांडूप (प) व इतर भागात डोंगर, टेकडयांच्या पायथ्याशी असलेल्या झोपडयांवर दरवर्षी पावसाळयात दरडी कोसळून होणारे अपघात व त्यांचेसाठी एसआरए योजना राबविण्याची आवश्यकता, माहे फेब्रुवारी, २०१८ च्या दरम्यान मुंबई शहरात अनेक ठिकाणी लागलेल्या आगींची चौकशी करण्याची आवश्यकता, सुभाषनगर चेंबूर येथे म्हाडा वसहतीमध्ये विकासकांनी मागील १०-१५ वर्षापासून रहिवाश्यांसोबत करारनामे करुनही अद्यापी पुनर्विकास न करता रहिवाश्यांची केलेली फसवणूक, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सहा : **सर्वश्री. अजित पवार, राधाकृष्ण विखे-पाटील, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, दिलीप वळसे-पाटील, शशिकांत शिंदे, विजय वडेट्टीवार, गणपतराव देशमुख, जितेंद्र आव्हाड, बाळासाहेब थोरात, जयदत्त क्षीरसागर, अब्दुल सत्तार, भास्कर जाधव, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री. हसन मुश्रीफ, सुनिल केदार, संदिप नाईक, गोपालदास अग्रवाल, डॉ. सतिश पाटील, सर्वश्री. मो. आरीफ नसीम खान, राजेश टोपे, अमित देशमुख, दिलीप सोपल, ॲड यशोमती ठाकूर, सर्वश्री. राणाजगजितसिंह पाटील, डि एस. अहिरे, बबनराव शिंदे, मधुकरराव चव्हाण, राहुल मोटे, डी. पी. सावंत, मकरंद जाधव-पाटील, कालिदास कोळंबकर, सुरेश लाड, बसवराज पाटील, शिवेंद्रसिंह भोसले, वसंतराव चव्हाण, दत्तात्रय भरणे, अमिन पटेल, बाळासाहेब पाटील, ॲड के.सी. पाडवी, सर्वश्री कुणाल पाटील, संग्राम जगताप, काशीराम पावरा, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. हर्षवर्धन सपकाळ, हनुमंत डोळस, राहुल बोंद्रे, अवधुत तटकरे, नितेश राणे, विजय भांबळे, वैभव पिचड, अमर काळे, पांडुरंग बरोरा, अमित झनक, दिपक चव्हाण, रणजित कांबळे, सर्वश्रीमती सुमन पाटील, अमिता चव्हाण, श्री प्रदिप जाधव-नाईक, डॉ. संतोष टारफे, श्री. शेख आसिफ शेख रशीद, श्रीमती निर्मला गावित, श्री अस्लम शेख, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री संग्राम थोपटे, भाऊसाहेब कांबळे, त्र्यंबक भिसे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री सिध्दाराम म्हेत्रे, भारत भालके, जयकुमार गोरे, राहुल जगताप, पंकज भुजबळ, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"राज्यात मराठी माध्यमाच्या १३४६ शाळा पटसंख्येचे कारण देऊन बंद करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, राज्यातील शाळाबाह्य मुलांचे दोन वेळा सर्वेक्षण करुन देखील किती

मुले शाळाबाह्य आहेत याचा निश्चित आकडा शासनाला अद्यापपर्यंत न मिळणे, मुंबई महापालिकेने बंद असलेल्या ३५ शाळांचे खाजगीकरण करणे, सर्व शिक्षा अभियान कार्यक्रम अपयशी ठरणे, पूर्व प्राथमिक प्रवेशाच्या तसेच आरटीई प्रवेशाच्या ऑनलाईन प्रक्रियेसाठी खाजगी इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडून भरमसाठ प्रवेशशुल्क आकारणी करणे, त्याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, विद्यार्थ्यांच्या पाठीवरील पुस्तकांचे ओझे कमी करण्याबाबत ठाम निर्णय न घेणे, राज्य शासनाने दिनांक ३० नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या परिपत्रकाद्वारे जाहीर केलेली प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र योजना ही केवळ घोषणाच राहणे, राज्यात जिल्हा परिषदेकडील प्राथमिक शाळांना पुरेशा वर्ग खोल्या नसणे, एका खोलीत दोन वर्ग भरविण्यात येणे, शासनाने कायम विनाअनुदानित शाळांचा कायम हा शब्द काढण्याचे धोरण मान्य केले असताना अनेक शाळांची २-३ वेळा तपासणी करुन देखील विनाअनुदानित शाळांना अद्याप अनुदान सुरु न करणे, सैनिकी शाळा, के.जी.बी.व्ही (कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय) आदर्श शाळा योजना यांसारख्या पूर्वी सुरु असलेल्या उपक्रमांत असलेल्या अडचणी व प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी शासन दरबारी अनेक वेळा प्रयत्न होऊन देखील त्यात काहीच सुधारणा न होणे, उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडील EBC/OBC/SC/ST/SBC या प्रवर्गातील जवळपास १७ लाख विद्यार्थ्यांची उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडील शैक्षणिक फी व इतर अनुदानाची असलेली प्रचंड थकबाकी, त्यामुळे वैद्यकीय, औषध निर्माण, व्यवस्थापन, अभियांत्रिकी महाविद्यालये आर्थिक अडचणीत सापडलेली असणे, शालेय, माध्यमिक व विद्यापीठीय शिक्षणाचा घसरत चाललेला दर्जा, राज्यात सुशिक्षित बेरोजगार तरुणांची वाढत चाललेली संख्या, सुशिक्षित बेरोजगार तरुणांना नोकऱ्यांचे आमिष दाखवून मॅग्नेटिक महाराष्ट्र, मेक इन महाराष्ट्र, स्टार्ट अप महाराष्ट्र आदी फसव्या घोषणा करुन सुशिक्षित बेरोजगार तरुणांच्या समोर नोकऱ्यांचे मृगजळ दाखविण्याचा केलेला प्रयत्न, राज्य शासनाच्या अनेक कार्यालयांमध्ये अ ते ड श्रेणीतील पदे रिक्त असूनही त्यावर नविन उमेदवारांच्या नियुक्त्या न करणे, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपत्र न देणे, तसेच नोकरभरतीवर घातलेल्या बंदीमुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परिक्षेची तयारी करणाऱ्या परिक्षार्थींमध्ये पसरलेला असंतोष व त्यांनी काढलेले मोर्चे, विदर्भ व मराठवाडयात छोटे मोठे उद्योग व्यवसाय सुरु करुन बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध करुन देण्याची संधी असतानाही शासनाचे त्यादृष्टीने नियोजन नसणे, देश पातळीवरील केंद्रिय लोकसेवा आयोगाच्या परिक्षांमध्ये मराठी टक्का वाढविण्यासाठी परीक्षार्थींना आवश्यक त्या मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात शासनाकडून होत असलेली चालढकल, मुंबई विद्यापीठांच्या विविध परिक्षांच्या निकालाचे पुर्नमुल्यांकनाचे रेंगाळलेले काम, कनिष्ठ महाविद्यालयीन अधिव्याख्यात्यांच्या दिर्घकालीन प्रलंबित असलेल्या मागण्या, इयत्ता १० वी व १२ वी च्या

परिक्षांचे प्रश्नपत्रिका फुटण्याचे घडत असलेले प्रकार, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त करुन देण्याच्या दृष्टीने शासनाला येत असलेले अपयश, राज्य सरकारच्या तसेच केंद्र सरकारच्या विविध कार्यालयामध्ये मराठी भाषेचा कार्यालयीन वापरात उपयोग करण्यासंदर्भात परिपत्रके काढण्याशिवाय ठोस उपाययोजना न करणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सात : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या तथापि, चर्चा न झालेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना (सूचना क्र. १ ते ३)**

**(१) श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी तालुक्याची सन १८७४ मध्ये तसेच सावली तालुक्याची सन १९९२ मध्ये निर्मिती होऊनही अद्यापि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ स्थापन न होणे, ब्रम्हपूरी व सावली हे दोन्ही तालुके धान उत्पादक म्हणून राज्यात प्रसिध्द असून या ठिकाणी एकही उद्योजक उद्योग सुरू करण्यास तयार नसल्यामुळे बेरोजगारांचे रोजगारासाठी शहराकडे होत असलेले स्थलांतर, प्रत्येक तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ स्थापन करावे असा शासनाचा निर्णय असतांनाही या दोन्ही ठिकाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ स्थापन न केल्यामुळे नागरीकांमध्ये पसरलेला असंतोष, परिणामी ब्रम्हपूरी आणि सावली येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ स्थापन करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(२) श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"सिंदेवाही (जि. चंद्रपूर) येथील तहसिल इमारत जुनी असून वाढत्या कामकाजाच्या व्यापामुळे सदर इमारत अपुरी पडणे, तालुका स्तरावरील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये एकाच इमारतीमध्ये सुरू करण्याकरिता सिंदेवाही येथे मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी १२ कोटी ३५ लाख रुपयांचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभाग, चंद्रपूर यांनी शासनास सादर करुन सुमारे दीड वर्षाचा कालावधी होऊनही त्यावर कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, सिंदेवाही येथे मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाच्या प्रस्तावास मान्यता

देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(३) श्री. संजय केळकर, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"ठाणे शहरात सुमारे ७० हजार भटके कुत्रे असून दरवर्षी ही संख्या दुप्पटीने वाढत असणे, महापालिका हद्दीत श्वान दंशाच्या अंदाजे ३० घटना घडत असून त्यामुळे अनेकजण जखमी होणे, देशात रेबिजमुळे ३५ हजार नागरिकांचा होत असलेला मृत्यु, श्वान दंशावरील लस अथवा औषधे सहजासहजी उपलब्ध होत नसल्याने रुग्णांच्या नातवाईकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, परिणामी यावर आळा घालण्यासाठी श्वान नसबंदी मोहीम मोठ्या प्रमाणात राबविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(गुरुवार, दिनांक १ मार्च, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या तथापि, चर्चा न झालेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (सूचना क्र. ४ व ५)**

**(४) श्री. सुनिल प्रभु, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"केंद्र शासनाने मुंबई शहरास स्मार्ट सिटी म्हणून घोषित करणे, स्मार्ट सिटी अंतर्गत देण्यात येत असलेल्या सुविधांमध्ये परिवहन सुविधा महत्वाची असून गत १५ वर्षात २७६६.७० कोटी रुपये इतका तोटा झाला असून बेस्ट उपक्रमावर तेवढेच कर्ज असणे, सदर कर्जाची परतफेड वेळेत न झाल्यास हा उपक्रम बंद होण्याची भिती, बेस्ट उपक्रम बंद झाल्यास ४६ हजार कर्मचारी व त्यांच्या कुटूंबियांवर उपासमारीचे संकट निर्माण होण्याची शक्यता, सबब, दिल्ली व कर्नाटक राज्याच्या धर्तीवर बेस्ट उपक्रमास सहाय्यनिधी देऊन नव संजिवनी देण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(५) डॉ. मिलिंद माने, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"नागपूर महानगरपालिकेने कामगारनगर, नारी सिंग रोड, नागपूर येथे आयसोलेशन रुग्णालयासाठी जागा निश्चित करणे, नागपूर येथील रुग्णालयात गॅस्ट्रो व इतर रुग्ण मोठया प्रमाणात आढळून येत असून इमामवाडा येथे एकमेव रुग्णालय असून त्याची रुग्णक्षमता अल्प प्रमाणात असल्यामुळे अनेक रुग्णांचा उपचाराअभावी झालेला मृत्यू, त्यामुळे नागपूर शहरात आयसोलेशन रुग्णालयाची निर्मिती करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(मंगळवार, दिनांक ६ मार्च, २०१८ रोजीच्या बॅलटव्दारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना क्र. ६ व ७)**

**(६) श्री. मंगलप्रभात लोढा, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबई, ठाण्यात ९० हजार पोलीस कार्यरत असून त्याप्रमाणात पोलीस वसाहतींची संख्या नगण्य असणे, मुंबई शहरातील जुन्या पोलीस वसाहतीमधील निवासस्थानाची झालेली दूरवस्था, पुरेशी जागा नसल्याने कर्मचाऱ्यांना पानकापड, टीनपत्रे उभारून नवीन खोली करून राहावे लागत असणे, पावसाळ्यात घरे गळत असल्यामुळे पोलीस कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, पोलीस कर्मचाऱ्यांच्या घरांचा प्रस्ताव मंजूरी अभावी प्रलंबित असून सदर प्रस्तावास तात्काळ मंजूरी देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया."

**(७) श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"सावली (जि. चंद्रपूर) येथील २७ वर्षे जुनी पाणी पुरवठा योजना नादुरुस्त असल्यामुळे पाणी पुरवठा अनेकवेळा बंद राहत असून नागरीकांना पाण्यापासून वंचित रहावे लागणे, २२ गावांच्या टेकडी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेची विद्युत देयके ग्रामपंचायतीने भरली नसल्यामुळे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना वारंवार बंद राहणे, सावली नगरपंचायतीने महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत सावली येथे जलशुध्दीकरण केंद्रासह वाढीव स्वतंत्र पाणी पुरवठा योजना मंजूर करुन त्यास निधी उपलब्ध करुन देण्याचा परिपूर्ण प्रस्ताव पाठवूनही शासनाने अद्यापि मंजूरी न दिल्यामुळे नागरीकांमध्ये पसरलेला असंतोष, सावली येथे जलशुध्दीकरण केंद्रासह स्वतंत्र वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या प्रस्तावास तातडीने प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ७ मार्च, २०१८

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.